<u>वार्ता टिपण दि.०१/११/२०१७</u>

# पुणे शहरात विक्रीस आलेला ८ लाख रुपयांचा गुटका टेम्पोतुन नेताना २ इसमांना गुन्हे शाखेच्या दक्षिण गुंडा स्कॉडने घेतले ताब्यात

---

दि.३१/१०/२०१७ रोजी गुडा स्कॉड दक्षिण विभागाचे पो.कॉ.प्रविण पडवळ यांना खब-याकडुन बातमी मिळाली कि,एक पांढऱ्या रंगाचा छोटा हत्ती टॅम्पो नं. एम.एच.१२ एम.व्ही. ७५८० हिचे मधुन महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला एम.गोल्ड, विमल, आर.एम.डी व सुगंधी मिक्स सुपारी भरलेला टॅम्पो हा कोथरूड मध्ये येणार आहे, अशी बातमी मिळाल्याने ती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राम राजमाने यांना सांगून त्यांनी बातमीची खात्री करुन कारवाई करणेबाबत आदेश देताच लागलीच स्टाफसह सदर ठिकाणी रवाना होवुन पौडरोडवरील संकल्प सोसायटी ,कोथरुड, येथे सापळा लावून टॅम्पो नं.एम.एच.१२ एम.व्ही.७५८० येताच तो ताब्यात घेतला व सदर टॅम्पोची तपासणी करता त्यामध्ये महाराष्ट्र राज्यात बंदी असलेला एम.गोल्ड, विमल आर.एम.डी ,सुगंधी मिक्स सुपारी असा कि.रु. ८,३९,७००/- व टेम्पो ३,५००००/- असा एकूण कि.रु. ११,८९,७००/-चा मुद्देमाल जप्त करणेत आलेला आहे.त्यामध्ये टॅम्पो चालक नामे १) प्रदिप बापु गाडे वय २९ रा.८३/१६५ शास्त्रीनगर,शिवाजंली मित्र मंडळाचे शेजारी, कोथरुड,पुणे व माल विक्री करीता घेवुन चाललेला इसमनामे २) सुजित राजकुमार खिवंसरा वय २५ रा.मराठा महासंघ सोसायटी,कोथरुड,पुणे यांना ताब्यात घेतले. सुजित राजकुमार खिवंसरा यांचेकडे चौकशीकरता सदरचा गुटका हा पुण्यामध्ये विक्रीसाठी आणला असल्याचे सांगीतल्याने त्यांना पुढील कारवाईसाठी–पुणे महसुल विभागाचे अन्न सुरक्षा अधिकारी श्री.के.एस.शिंदे यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

**सदरची कामगिरी गुन्हे शाखा, पुणे शहरचे श्री.प्रदिप देशपांडे सो-अपर पोलीस आयुक्त, गुन्हे.श्री.पंकज डहाणे सो, पोलीस उप आयुक्त,गुन्हे.श्री.समीर शेख सो-सपोआ,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा स्कॉड दक्षिण विभागाचे पोलीस निरीक्षक श्री.राम राजमाने, सहा.पो.फौज.राजेंद्रसिंग चौहान,रविंद्र कदम, सुनिल चिखले, प्रशांत पवार, गणेश साळुकें, प्रविण पडवळ, नितीन रावळ,कैलास साळुंके,अजय उत्तेकर, विवेक जाधव, किरण ठवरे, राकेश खुणवे,यांनी केली आहे. तसेच अन्न सुरक्षा विभागाचे अधिकारी श्री.के.एस.शिंदे यांनी केली आहे.**